# विवरणपत्र : अ :
## जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती बाबत जाहीर प्रकटन.
## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,यवतमाळ

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट-क संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी माहे मार्च २०१९ मध्ये शासनाच्या महाआयटी मार्फत महापोर्टलवर जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु तत्कालीन परिस्थितील महापोर्टल बंद झाल्याने सदरची परिक्षा प्रक्रिया पुर्ण होऊ शकली नाही. दरम्यान कोविड-१९ साथ रोगाच्या पार्श्वभुमीवर तसेच इतर साथरोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामीण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्राम विकास विभागा अंतर्गतत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गातील माहे मार्च -२०१९ मध्ये दिलेल्या जाहीरातीमधील नमुद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. माहे मार्च २०१९ चे जाहीरातीमध्ये दिव्यांगाकरीता ३ टक्के आरक्षण निश्चित केले होते. परंतु दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार दिव्यांगासाठी ४ टक्के आरक्षण निश्चित करण्यांत आले असल्याने दिव्यांगाच्या वाढीव पदासाठी त्याच प्रमाणे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्द झाले असल्याने सदर प्रवर्गातील राखीव जागा अराखीव जागेमध्ये रुपांतरीत झाल्या असल्यामुळे खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणामध्ये बदल झाल्यानुसार पदे निश्चित करुन सदर जाहीरातीनुसार भरावयाच्या रिक्त पदांचा सुधारित तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | संवर्ग | दिव्यांगासाठी राखीव असलेली एकुण पदे | गट | दिव्यांगाचा प्रकार () यामध्ये दर्शविण्यात आलेले दिव्यांगामधील प्रकार पात्र राहील | राखीव पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५०% हंगामी फवारणी आरोग्य सेवक पुरुष | अ.जाती / अनु.जमाती / ई.डब्ल्यू.एस / खुला | | | |
| | | २ | अ | १) (LV) Low Vision अल्पदुष्टी | १ |
| | | | ब | २) D (बहीरा) ३) HH (कर्णबधीर) | १ |
| २ | सर्व साधारण आरोग्य सेवक महिला | अ.जाती / अनु.जमाती / ई.डब्ल्यू.एस / खुला | | | |
| | | ४ | अ | १) (LV) Low Vision अल्पदुष्टी | १ |
| | | | ब | १) D ( बहीरा) २) HH (कर्णबधीर) | १ |
| | | | क | १) OL (एकापायाने) २) CP (मेन्दुचा पक्षघात) ३) LC (कुष्ठरोग मुक्त) | १ |
| | | | ड | १) DW (शारिरीक वाढ खुंटणे) २) AAV (आम्ल हल्ला ग्रस्त) | १ |
| ३ | पेसा क्षेत्र आरोग्य सेवक पुरुष ५० % (हंगामी कर्मचारी) | अनुसुचित जमाती | | | |
| | | २ | अ | १) (LV) Low Vision अल्पदुष्टी | १ |
| | | | ब | २) D (बहीरा) ३) HH (कर्णबधीर) | १ |
| ४ | पेसा क्षेत्र आरोग्य सेवक पुरुष ४० % | अनुसुचित जमाती | | | |
| | | १ | अ | १) (LV) Low Vision अल्पदुष्टी २) D ( बहीरा) ३) HH (कर्णबधीर) ४) OL (एकापायाने) ५) CP (मेन्दुचा पक्षघात) | १ |
| ५ | पेसा क्षेत्र आरोग्य सेवक महिला | अनुसुचित जमाती | | | |
| | | ४ | अ | १) (LV) Low Vision अल्पदुष्टी | १ |
| | | | ब | १) D ( बहीरा) २) HH (कर्णबधीर) | १ |
| | | | क | १) OL (एकापायाने) २) CP (मेन्दुचा पक्षघात) ३) LC (कुष्ठरोग मुक्त) | १ |
| | | | ड | १) DW (शारिरीक वाढ खुंटणे) २) AAV (आम्ल हल्ला ग्रस्त) | १ |

**शासन पत्र दिनांक २५/०६/२०२१ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास प्रवर्गाची (एसईबीसी) आरक्षण रद्द झाल्याने खुल्या प्रवर्गात समांतर आरक्षणात बदल होत असल्याने खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणात वाढीव पदाची जाहीरात.**

### आरोग्य पर्यवेक्षक

| १ | आरोग्य पर्यवेक्षक | अजा | अज | विजाअ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | ईमाव | ईडब्ल्यु एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पदसंख्या | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | २ |
| | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| | सर्वसाधारण महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| | एकुण | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | २ |

### औषध निर्माण अधिकारी

| २ | औषध निर्माता. | अजा | अज | विजाअ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | ईमाव | ईडब्ल्यु एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पदसंख्या | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| | एकुण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

### प्रयोगशाळा तंत्रज्ञ

| ३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | अजा | अज | विजाअ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | ईमाव | ईडब्ल्यु एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पदसंख्या | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| | एकुण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

### ५० % हंगामी फवारणी कर्मचारी आरोग्य सेवक पुरुष (नॉन पेसा)

| ४ | आरोग्य सेवक पुरुष ५०% (नॉन पेसा) | अजा | अज | विजाअ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | ईमाव | ईडब्ल्यु एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पदसंख्या | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | २ |
| | खेळाडू | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| | प्रकल्प ग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| | एकुण | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | २ |

**अटी व शर्ती :-**

१) केन्द्र शासनाच्या दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार दिव्यांगांच्या नव्याने समाविष्ठ प्रवर्गा करीता तसेच सामाजीक व आर्थीकदष्टया (एसईबीसी) मागास प्रवर्ग रद्द झाल्याने, खुल्या प्रवर्गांतर्गत नव्याने वाढलेल्या समांतरआरक्षणाच्या प्रवर्गाकरीता जाहीरात प्रसिध्द करण्यांत येत असून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत असून ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे कालावधी दिनांक ०१ सप्टेबर २०२१ ते २१ सप्टेबर २०२१ पर्यन्त राहील.

२) नव्याने समाविष्ठ झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर यापूर्वी माहे मार्च २०१९ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीरातीनुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातुन अर्ज सादर केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल. तसेच यापूर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगाच्या पदनिहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगाकरीता नव्याने प्रसिध्द करण्यांत आलेल्या जाहीराती नुसार विकल्प देणे आवश्यक आहे. विकल्प देण्याचा कालावधी ०१ सप्टेबर २०२१ ते १४ सप्टेबर २०२१ पर्यन्त राहील.

३) उमेदवारांसाठी निश्चीत करावयाचे निकष वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता, व इतर बाबी यापूर्वी सन २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यांत आलेल्या जाहीरातीप्रमाणे राहतील व त्यामधील अटी व शर्ती कायम राहतील.

४) सरळसेवा भरती संदर्भातील सन २०१९ मध्ये दिलेल्या जाहिरातीनुसार संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून ऑनलाईन पध्दतीने अर्ज www.maharddzp.com या संकेतस्थळावर सादर करावे.

## माहे मार्च, २०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबधीत पदांकरीता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालील प्रमाणे सुचना देण्यांत येत आहे.

१) माहे मार्च २०१९ मधील जाहीरातीनुसार आरोग्य विभागाशी संबंधीत पदाकरीता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदारांनी www.maharddzp.com या संकेतस्थळावर जावुन Login ID व Password Create करणे आवश्यक आहे.

२) माहे मार्च, २०१९ मध्ये आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गाकरीता आवदेनपत्र / अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी सामाजीक व शैक्षणीकदष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांव्यतिरीक्त इतर प्रवर्गातून अर्ज सादर केलेले उमेदवार संबधीत प्रवर्गातून परिक्षेकरीता पात्र राहतील.

३) मा.सर्वोच्च न्यायालयाने विषेश अनूज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमध्ये शासकीय नोक-यांमधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास प्रवर्गाचे (SEBC) आरक्षण रद्द ठरविले आहे. सामान्य प्रशासन विभागाने सामाजीक व शैक्षणीकदुष्टया मागास (SEBC) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थीकदष्टया दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक २३ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली अ ाहे. या नुसार सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थीकदष्टया दुर्बल प्रवर्गातून (EWS) आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छीक असेल. या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी आर्थीकदूष्टया दुर्बल प्रवर्गा बाबत (EWS) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरिल प्रमाणे नमुद संकेतस्थळावर दिनांक १ सप्टेबर, २०२१ ते १४ सप्टेबर, २०२१ या कालावधीत विकल्प दयावेत. उमेदवाराने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तथापि, ज्या सामाजीक व शैक्षणीकदष्टया मागास (एसईबीसी) (SEBC) प्रवर्गातील उमेदवाराने आर्थिकदष्टया मागास ईडब्ल्यूएस (EWS) प्रवर्गाचा विकल्प दिला आहे, त्याने परिक्षेपूर्वी सक्षम अधिका-यांचे आर्थिकदष्टया मागास (EWS) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा निवड समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. परिक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे ईडब्ल्यूएस आर्थिकदष्टया मागास प्रवर्गाचे (EWS) प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

४) जे सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार आर्थिकदष्टया मागास प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाहीत तथापी, खुल्या प्रवर्गातील वयोमर्यादेकरीता पात्र आहेत अशा उमेदवरांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणून गणण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी लागू असलेले परिक्षा शुल्क (या पूर्वी एसईबीसी प्रवर्गातून अदा केलेली रक्कम वगळता उर्वरीत रक्कम) परिक्षेपूर्वी अदा करणे आवश्यक राहील. सदर उमेदवारांनी दिनांक १ सप्टेबर २०२१ ते १४ सप्टेबर २०२१ या कालावधीत वरील प्रमाणे नमुद संकेतस्थळावरुन शुल्क अदा करण्याचे उपलब्ध पर्याय वापरुन शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

५) मार्च २०१९ च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परिक्षे करीता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जासत जिल्हा परिषदांसाठी तसेच एका किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदामध्ये एकाच दिवशी आयोजीत करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधून परीक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एका पेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरीता अर्ज सादर केले आहेत, अशा उमेदवानांनी परिक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरील प्रमाणे नमुद संकेतस्थळावर दिनांक १ सप्टेबर २०२१ ते १४ सप्टेबर २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहील.

६) नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर या पूर्वी माहे मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीरातीनुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातुन अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल. तसेच यापूर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगांच्या पदनिहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगांकरिता नव्याने प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीनुसार विकल्प देणे आवश्यक आहे.

७) या पूर्वी उमेदवारांकडुन लेखी परीक्षेस प्रत्यक्ष कोणत्या परीक्षा केद्रामधुन परीक्षा देणार आहे. त्या परीक्षा केद्राबाबत प्राधान्यक्रम घेण्यात आले होते. सदर प्राधान्यक्रमानुसार उमेदवारास संबंधित जिल्हयातून परिक्षेस बसण्याबाबत प्रवेशपत्र पाठविण्यांत येईल.

८) माहे मार्च, २०१९ च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता एका पदाकरीता एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांनी सर्व ठिकाणी परीक्षा शुल्क भरलेले आहे. तथापी उमेदवारांना एकाच ठिकाणी परीक्षा देता येणार असल्याने संबंधित उमेदवारांनी भरलेले अधिकचे परीक्षा शुल्क प्राप्त करुन घेण्यासाठी वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावर आवश्यक बँक तपशील नमुद करणे आवश्यक आहे.

९) विकल्प नोंदविताना काही अडचणी उध्दभवल्यास उमेदवारांनी ०७२९२००६३०५ या भ्रमध्वनीवर संपर्क साधावा.

१०) सदर जाहीरातीमध्ये निश्चीत करावयाचे निकष (वयोमर्यादा, शैक्षणीक पात्रता व इतर) या पूर्वी दिलेल्या सन २०१९ चे जाहीराती प्रमाणे राहील.

वरील प्रमाणे भरती प्रक्रियेमध्ये आश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकारी शासन स्तरावर राखुन ठेवण्यांत येतील.

| | | |
|---|---|---|
| सदस्य सचिव<br>जिल्हा निवड समिती तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद यवतमाळ. | सदस्य<br>जिल्हा निवड समिती तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद यवतमाळ. | अध्यक्ष<br>जिल्हा निवड समिती तथा<br>जिल्हाधिकारी, यवतमाळ. |

(ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.९९/आस्था-८, दि.२० ऑगस्ट, २०२१ चे सहपत्र)
विवरणपत्र :ब:

जिल्हा परिषद यवतमाळ कडील आरोग्य विभागाशी संबंधीत औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सेवक (पुरुष) आरोग्य सेविका या संवर्गातील पदभरती करिता पुढील वेळापत्रका नुसार कार्यवाही करण्यांत येईल.

| अ.क्र. | कालबध्द कार्यक्रम | कालावधी | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | माहे, २०१९ मध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांबाबत :-<br>एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकडुन जिल्हयांचा विकल्प घेणे / सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास (एसईबीसी) उमेदवारांकडून विकल्प प्राप्त करुण घेणे / सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास (एसईबीसी) उमेदवारांकडून विकल्प प्राप्त करुण घेणे / सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास (एसईबीसी) उमेदवारांकडून प्राप्त विकल्पानुसार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देणा-या / खुल्या प्रवर्गात गणना होणा-या खुल्या प्रवर्गासाठीच्या वयोमर्यादेत पात्र होणा-या एसईबीसी उमेदवारांकडुन परिक्षा शुल्क आकारणे / ज्या सामाजिक व शैक्षणिकदष्टया मागास उमेदवारांनी ईडब्ल्यूएस प्रवर्गाचा विकल्प दिला आहे त्यांच्याकडून ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे, दिव्यांगाचा आरक्षणात बदल होत असल्याने अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांकडुन नव्याने निश्चीत केलेल्या दिव्यांग उमेदवारांकडून नव्याने निश्चीत केलेल्या दिव्यांग आरक्षणानुसार विकल्प घेणे नव्याने समाविष्ठ दिव्यांग उमेदवाराने यापुर्वी खुल्या अथवा इतर प्रवर्गातुन अर्ज केला असल्यास सदर उमेदवाराकडून दिव्यांग आरक्षणाचा विकल्प घेणे. | २ आठवडे | ०१ सप्टेंबर २०२१<br>ते<br>१४ सप्टेंबर २०२१ |
| २ | नव्याने समाविष्ट दिव्यांग तसेच नव्याने वाढलेल्या खुल्या प्रवर्गातील रिक्त जागांसाठी उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविणे. | ३ आठवडे | ०१ सप्टेबर<br>ते<br>२१ सप्टेबर २०२१ |
| ३ | पात्र उमेदवारांचे परिक्षा प्रवेशपत्र तयार करुन संबंधीत उमेदवारांना डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध करुन देणे. | १० दिवस | ०६ ऑक्टोबर २०२१<br>ते<br>१५ ऑक्टोबर २०२१ |
| ४ | **परिक्षेचे आयोजन :-**<br>प्रयोगशाळा तंत्रज्ञ. (सकाळी ११.०० ते १.००)<br>औषध निर्माता, (दुपारी ३.०० ते ५.००) | - | १६ आक्टोबर २०२१ |
| | आरोग्य सेवक (पुरुष) (सकाळी ११.०० ते १.००)<br>आरोग्य सेविका, (सकाळी ११.०० ते १.००)<br>आरोग्य पर्यवेक्षक (दुपारी ३.०० ते ५.००) | - | १७ आक्टोबर २०२१ |
| ५ | लेखी परिक्षेनंतर Answer Key प्रसिध्द करणे / उमेदवारांना Objection filing करणे, अंतिम निकाल जाहिर करणे / पात्र उमेदवारांची यादी जाहीर करणे व त्या अनुषंगाने नियुक्ती आदेश देणे | २ आठवडे | १८ ऑक्टोबर २०२१<br>ते<br>०१ नोव्हेंबर, २०२१ |
| ६ | लेखी परिक्षेनंतर Answer Key प्रसिध्द झाल्यानंतर Objection filing` करणे करीता कालावधी. | - | Answer Key प्रसिध्द झाल्या पासुन तिन दिवस |

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ.

सदस्य
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ.

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी, यवतमाळ.